**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड**
**सभावृत्तांत**
**कार्यपत्रिका क्र. १०**

**दिनांक :- २०/१/२०१०** **वेळ :- दु. १२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची जानेवारी २०१० ची मासिक सभा बुधवार दि. १३/१/२०१० रोजी दु. १२.१५ आयोजित करणेत आली तथापि सदर दिवशी सकाळी ११.०० वा. मा. महापौर सो. यांनी सर्व नगरसदस्यांचे समवेत ॲटो क्लस्टर येथे मिटींग घेतल्यामुळे प्रभाग समिती रद्द करणेत आली. त्यामुळे प्रस्तुतची सभा दि. २०/१/२०१० रोजी दु. १२.१५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत बैठकीस खालील प्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. तिकोने हरिभाऊ किसन | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. पिल्ले रामकृष्ण गोविंदस्वामी | सदस्य |
| ३. | मा. श्री. भोसले यशवंत अनंतराव | सदस्य |
| ४. | मा. श्री. चौधरी अख्तरहुसेन तालुकादार | सदस्य |
| ५. | मा. श्री. भोंडवे तुकाराम महादू | सदस्य |
| ६. | मा. श्री. भोंडवे गणेश तुकाराम | सदस्य |
| ७. | मा. श्री. साळुंके राजेंद्र गुलाबराव | सदस्य |
| ८. | मा. श्री. बाराहाते शरद भगवंतराव | सदस्य |
| ९. | मा. श्रीम. गावडे जयश्री वसंत | सदस्या |
| १०. | मा. श्री. पहलानी गुरुबक्ष किशनदास | सदस्य |
| ११. | मा. श्री. डब्बु आसवानी | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.
मा. प्रभाग अधिकारी - डी. के. गावडे, मा. कार्यकारी अभियंता - श्री. मकरंद निकम, श्री. रामदास जाधव, श्री. ए.ए. पठाण, प्रशासन अधिकारी - श्री. आर.एम. कोंढाळकर, सहा. आरोग्याधिकारी - श्री. बी.एस. नामपूरकर, लेखाधिकारी- श्री. पी.सी. कांबळे, उपअभियंता - श्री. एफ.बी. शेख, श्री. आर.एस. पवार, श्री. डी.एस. भोईटे, श्रीम. एल.एस. बाबर, श्री. मनोज सेठिया, श्री. प्रवीण घोडे, श्री. पी.आर. काळुस्कर, श्री. एम.डी. पाटोदकर, श्री. दिलीप कुदळे, कनिष्ठ अभियंता - श्री. भालेराव यु.एन. श्री. मेंगशेट्टी ए.एम.

सर्व प्रथम मा. अध्यक्ष हरिभाऊ किसन तिकोने यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली. विषयपत्रिकेवर एक विषय असल्याने मा. अध्यक्ष यांचे परवानगीने खालील विषय ऐन वेळचे विषय म्हणून सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्र. २** **विभाग :- भुयारी गटर योजना**

एस टी पी व पंप हाउसेस येथील ॲटोमॅटीक पॉवर फॅक्टर कंट्रोल युनिट्सची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ६,६२,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देणे.

**विषय क्र. ३** **विभाग :- झोनिपु स्थापत्य**

प्रभाग क्र. ३४ मधील झोपडपट्टीत वाचनालय पुरविणे व बसविणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ९,९९,५००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देणे.

**विषय क्र. ४** **विभाग :- झोनिपु स्थापत्य**

भाटनगर इमारत क्र. ५,६,७, व ८ परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ९,९८,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देणे.

**विषय क्र. ५** **विभाग :- झोनिपु स्थापत्य**

भाटनगर इमारत क्र. ९, १० व ११ परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ९,९९,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देणे.

**विषय क्र. ६** **विभाग :- वायरलेस विभाग**

मनपा सुरक्षा विभागाकरीता वायरलेस यंत्रणा उभारणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. १०,००,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देणे.

**विषय क्र. ७** **विभाग :- मा. सदस्यांचा प्रस्ताव**

विषय :- मुंबई - पुणे रेल्वेच्या कडेने गोकुळ हॉटेल पर्यत रस्त्यासाठी जागा ताब्यात घेणेबाबत

मुंबई - पुणे रस्त्यावरुन पिंपरीकडे जाणा-या रस्त्यावर आर.ओ.बी. बांधण्यात आलेला आहे. सदरच्या रस्त्यावर नागरिक व वाहतुक यांची वर्दळ मोठया प्रमाणावर वाढली असल्याने त्या ठिकाणी नेहमी वाहतुकीचा खोळंबा होतो. याकरीता पिंपरी येथे जाणेकरीता आर.यु.बी. करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे नागरिकांची वाहतुक सोयीची होणार आहे.

तरी सदर आर.यु.बी. साठी मुंबई-पुणे रस्त्यापासून स.नं. २०१ व २०२ मधून जाणारा दक्षिणोत्तर सध्याचा रेल्वे लाईन पर्यंतचा रस्ता म.न.पा. ने ताब्यात घ्यावा. तसेच गोकुळ हॉटेल पासून रेल्वे लाईनकडे येणा-या ९.०० मी. डी.पी. रस्त्याचे दक्षिण टोका पासून पुढे रेल्वे लाईनच्या कडेने पूर्वेकडे जाणारा ९.०० मी. रुंदीचा स.नं. २०१ व २०२ मधील रस्त्यापर्यंतचा रस्ता करणेस जागा ताब्यात घेणेकामी मा. प्रभाग समितीमार्फत मा. महापालिका सभेची मान्यता मिळावी.

**विषय क्र. ८** **विभाग :- मा. सदस्यांचा प्रस्ताव**

वाल्हेकरवाडीकडे येणारा प्राधिकरणाकडील स्पाईन रोड चौकास पिंपरी चिंचवड नगरपालिकेचे पहिले उपनगराध्यक्ष कै. धोंडूतात्या चिंचवडे यांचे नांव देणेत यावे.

कै. तात्यांचे कार्य या भागातील सर्वांना ज्ञात आहे. राजकीय क्षेत्रातील अत्यंत पारदर्शक कारभार करणा-या तात्यांनी जनसामान्यांना नेहमीच न्याय दिला. ज्या भागातून सदर स्पाईन रोड जात आहे. त्या भागातील शेतक-यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला. नगरपालिकेच्या स्थापनेनंतर डॉ. घारे यांचे समवेत नागरिकांच्या हिताचे अनेक निर्णय त्यांनी घेतले. एक कलावंत, आधुनिक दृष्टी असलेला शेतकारी, व्यावसायिक दृष्टीकोन जोपासणारे व्यक्तिमत्व, शैक्षणिक कार्यामध्ये चिंचवड शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना , ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिकांचा आधार अशी ख्याती असणारे आणि नाटयक्षेत्रात सक्रीय सहभाग वैचारिक क्रांतीसाठी सतत आग्रही अशा कर्तृव संपन्न व्यक्तीचे नाव चौकाला दिल्यास त्यांचे कार्याचे सदैव स्मरण घडेल.

तरी सदर चौकास **कै. धोंडूतात्या चिंचवडे चौक** असे देणेकामी ब प्रभाग समितीचे दि. १३/१/२०१० रोजीचे मासिक सभेमध्ये ठराव मंजुर करुन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९** **विभाग :- मा. सदस्यांचा प्रस्ताव**

**विषय :-** पिंपरी भाजीमंडई येथील संडास ब्लॉक सुलभ संस्थेस चालविणेस देणेबाबत

पिंपरीनगर येथे भाजीमंडई इमारतीजवळ मनपामार्फत लेडीज/जेन्टस करीता मुतारी ब्लॉक बांधणेत येत आहे. सदरचे काम पुर्णत्वाचे मार्गावर आहे. सदर ठिकाण हे वर्दळीचे व बाजारपेठेचे असल्यामुळे त्याचा वापर जादा होण्याची शक्यता आहे. सदर ठिकाणी साफसफाई व स्वच्छता राहण्याच्या दृष्टीने सदरचा संडास ब्लॉक सुलभ संस्थेस दिलेस सदर ठिकाणी कायमस्वरुपी स्वच्छता राहील. त्यादृष्टीने प्रभाग समितीची मान्यता घेऊन कार्यवाही करणेत यावी.

**विषय क्र. १०** **विभाग :- मा. सदस्यांचा प्रस्ताव**

विषय :- पिंपरी भाजीमंडई येथील मुतारी पाडणेबाबत

पिंपरीनगर येथील भाजीमंडई पार्कीगजवळ जुनी मुतारी ब्लॉक आहे. सदर ठिकाणी मुतारी ब्लॉकमुळे बाजूस घाण होत असून दुर्गंधी सगळीकडे पसरत आहे. सदर ठिकाणचे नागरिक मुतारी पाडून परिसर स्वच्छ करणेबाबत मागणी करीत आहेत.

तरी सदर ठिकाणचा मुतारी ब्लॉक पाडून मिळावा, हि विनंती व त्यादृष्टीने पुढील कार्यवाही करणेत यावी.

**विषय क्र. ११** **विभाग :- मा. सदस्यांचा प्रस्ताव**

**विषय :-** हॉकर्स झोनला नाव देणेबाबत

पिंपरी मासूळकर कॉलनी वॉर्ड क्र. २९ येथे स्थापत्य विभागातर्फे हॉकर्स झोन तयार करण्याचे काम पुर्ण करण्यात आले आहे. सदर हॉकर्स झोनचे **कै. शंकरराव उर्फ भाऊसाहेब तुकाराम मासूळकर हॉकर्स झोन** असे नामकरण करण्यात यावे.

ठराव क्र. १५९ विषय क्र. १
दिनांक :- २०/१/२०१० विभाग :- वायरलेस
सुचक :- मा. अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक :- मा. यशवंत भोसले

मा. सहशहर अभियंता यांचेकडील पत्र क्र. दूरसंचार/कावि/९०३/०९ दि. १५/१२/०९

मा. सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जकात विभागाकरीता वायरलेस यंत्रणा उभारणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. १०,००,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्र. १६० विषय क्र. २
दिनांक :- २०/१/२०१० विभाग :- भुयारी गटर योजना
सुचक :- मा. जयश्री गावडे अनुमोदक :- मा. राजेंद्र साळुंके

मा. सहशहर अभियंता यांचेकडील पत्र क्र. वि/भुगयो/तां/३५२/२०१० दि. ४/१/२०१०

मा. सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

एस टी पी व पंप हाउसेस येथील अॅटोमॅटीक पॉवर फॅक्टर कंट्रोल युनिट्सची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ६,६२,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्र. १६१ विषय क्र. ३
दिनांक :- २०/१/२०१० विभाग :- झोनिपु स्थापत्य
सुचक :- मा. अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक :- मा. यशवंत भोसले

मा. सक्षम प्राधिकारी, झोनिपु स्थापत्य यांचेकडील पत्र क्र. झोनिपु/स्था/कावि/९/२०१० दि. ४/१/२०१०

मा. सक्षम प्राधिकारी, झोनिपु स्थापत्य यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र. ३४ मधील झोपडपट्टीत वाचनालय पुरविणे व बसविणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ९,९९,५००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्र. १६२ विषय क्र. ४
दिनांक :- २०/१/२०१० विभाग :- झोनिपु स्थापत्य
सुचक :- मा. गुरुबक्ष पहलानी अनुमोदक :- मा. डब्बु आसवानी

मा. सक्षम प्राधिकारी, झोनिपु स्थापत्य यांचेकडील पत्र क्र. झोनिपु/स्था/कावि/१२/२०१० दि. ४/१/२०१०

मा. सक्षम प्राधिकारी, झोनिपु स्थापत्य यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भाटनगर इमारत क्र. ५,६,७, व ८ परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ९,९८,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्र. १६३ विषय क्र. ५
दिनांक :- २०/१/२०१० विभाग :- झोनिपु स्थापत्य
सुचक :- मा. गुरुबक्ष पहलानी अनुमोदक :- मा. डब्बु आसवानी

मा. सक्षम प्राधिकारी, झोनिपु स्थापत्य यांचेकडील पत्र क्र. झोनिपु/स्था/कावि/१०/२०१० दि. ४/१/२०१०

मा. सक्षम प्राधिकारी, झोनिपु स्थापत्य यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भाटनगर इमारत क्र. ९, १० व ११ परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ९,९९,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्र. १६४ विषय क्र. ६
दिनांक :- २०/१/२०१० विभाग :- वायरलेस विभाग
सुचक :- मा. गुरुबक्ष पहलानी अनुमोदक :- मा. डब्बु आसवानी

मा. सहशहर अभियंता यांचेकडील पत्र क्र. दूरसंचार/०६/२०१० दि. १०/१/२०१०

मा. सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा सुरक्षा विभागाकरीता वायरलेस यंत्रणा उभारणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. १०,००,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्र. १६५ विषय क्र. ७
दिनांक :- २०/१/२०१० विभाग :- मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा. स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा. गणेश भोंडवे

सन्मा. नगरसदस्या स्मिता गुंजेकर यांचेकडील पत्र दि. १३/१/२०१०

विषय :- मुंबई - पुणे रेल्वेच्या कडेने गोकुळ हॉटेल पर्यत रस्त्यासाठी जागा ताब्यात घेणेबाबत

मुंबई - पुणे रस्त्यावरुन पिंपरीकडे जाणा-या रस्त्यावर आर.ओ.बी. बांधण्यात आलेला आहे. सदरच्या रस्त्यावर नागरिक व वाहतुक यांची वर्दळ मोठया प्रमाणावर वाढली असल्याने त्या ठिकाणी नेहमी वाहतुकीचा खोळंबा होतो. याकरीता पिंपरी येथे जाणेकरीता आर.यु.बी. करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे नागरिकांची वाहतुक सोयीची होणार आहे.

तरी सदर आर.यु.बी. साठी मुंबई-पुणे रस्त्यापासून स.नं. २०१ व २०२ मधून जाणारा दक्षिणोत्तर सध्याचा रेल्वे लाईन पर्यंतचा रस्ता म.न.पा. ने ताब्यात घ्यावा. तसेच गोकुळ हॉटेल पासून रेल्वे लाईनकडे येणा-या ९.०० मी. डी.पी. रस्त्याचे दक्षिण टोका पासून पुढे रेल्वे लाईनच्या कडेने पूर्वेकडे जाणारा ९.०० मी. रुंदीचा स.नं. २०१ व २०२ मधील रस्त्यापर्यंतचा रस्ता करणेस जागा ताब्यात घेणेस मा. महापालिका सभेपुढे मान्यतेकामी शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही सुरु करणेत यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्र. १६६ विषय क्र. ८
दिनांक :- २०/१/२०१० विभाग :- मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा. गणेश भोंडवे अनुमोदक :- मा. डब्बु आसवानी

सन्मा. नगरसदस्य गणेश भोंडवे यांचेकडील पत्र दि. १३/१/२०१०

विषय :- बिजलीनगर वाल्हेकरवाडी स्पाईनरोड चौकाचे नामकरणाबाबत

पिंपरी चिंचवड नगरपालिकेचे पहिले उपनगराध्यक्ष **कै. धोंडूतात्या चिंचवडे** यांचे कार्य सर्वांना ज्ञात आहे. राजकीय क्षेत्रातील अत्यंत पारदर्शक कारभार करणा-या तात्यांनी जनसामान्यांना नेहमीच न्याय दिला. ज्या भागातून सदर स्पाईन रोड जात आहे. त्या भागातील शेतक-यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला. नगरपालिकेच्या स्थापनेनंतर डॉ. घारे यांचे समवेत नागरिकांच्या हिताचे अनेक निर्णय त्यांनी घेतले. एक कलावंत, आधुनिक दृष्टी असलेला शेतकारी, व्यावसायिक दृष्टीकोन जोपासणारे व्यक्तिमत्व, शैक्षणिक कार्यामध्ये चिंचवड शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना , ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिकांचा आधार अशी ख्याती असणारे आणि नाटयक्षेत्रात सक्रीय सहभाग वैचारिक क्रांतीसाठी सतत आग्रही अशा कर्तृव संपन्न व्यक्तीचे नाव चौकाला दिल्यास त्यांचे कार्याचे सदैव स्मरण घडेल.

तरी वाल्हेकरवाडीकडे येणा-या प्राधिकरणाकडील स्पाईन रोड चौकास **कै. धोंडूतात्या चिंचवडे चौक** असे नाव देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्र. १६७ विषय क्र. ९
दिनांक :- २०/१/२०१० विभाग :- मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा. डब्बु आसवानी अनुमोदक :- मा. यशवंत भोसले

सन्मा. नगरसदस्य गुरुबक्ष पेहलानी यांचेकडील पत्र दि. १३/१/२०१०

**विषय :-** पिंपरी भाजीमंडई येथील संडास ब्लॉक सुलभ संस्थेस चालविणेस देणेबाबत

पिंपरीनगर येथे भाजीमंडई इमारतीजवळ मनपामार्फत लेडीज/जेन्टस करीता मुतारी ब्लॉक बांधणेत येत आहे. सदरचे काम पुर्णत्वाचे मार्गावर आहे. सदर ठिकाण हे वर्दळीचे व बाजारपेठेचे असल्यामुळे त्याचा वापर जादा होण्याची शक्यता आहे. सदर ठिकाणी साफसफाई व स्वच्छता राहण्याच्या दृष्टीने सदरचा संडास ब्लॉक सुलभ संस्थेस दिलेस त्याची कायमस्वरुपी स्वच्छता राहील. तरी सदरचे संडास ब्लॉक सुलभ संस्थेस देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्र. १६८ विषय क्र. १०
दिनांक :- २०/१/२०१० विभाग :- मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा. डब्बु आसवानी अनुमोदक :- मा. यशवंत भोसले

सन्मा. नगरसदस्य गुरुबक्ष पेहलानी यांचेकडील पत्र दि. १३/१/२०१०

विषय :- पिंपरी भाजीमंडई येथील जुनी मुतारी पाडणेबाबत

पिंपरीनगर येथील भाजीमंडई पार्कीगजवळ जुनी मुतारी ब्लॉक आहे. सदर ठिकाणी मुतारी ब्लॉकमुळे बाजूस घाण होत असून दुर्गंधी सगळीकडे पसरत आहे. सदर ठिकाणचे नागरिक मुतारी पाडून परिसर स्वच्छ करणेबाबत मागणी करीत आहेत.

तरी सदर ठिकाणचा मुतारी ब्लॉक पाडणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्र. १६९ विषय क्र. ११
दिनांक :- २०/१/२०१० विभाग :- मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा. शरद बाराहाते अनुमोदक :- मा. गणेश भोंडवे

सन्मा. नगरसदस्य राजेश पिल्ले यांचेकडील पत्र दि. १३/१/२०१०

**विषय :-** हॉकर्स झोनला नाव देणेबाबत

पिंपरी मासूळकर कॉलनी वॉर्ड क्र. २९ येथे स्थापत्य विभागातर्फे हॉकर्स झोन तयार करण्याचे काम पुर्ण करण्यात आले आहे. सदर हॉकर्स झोनचे **कै. शंकरराव उर्फ भाऊसाहेब तुकाराम मासूळकर हॉकर्स झोन** असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. अध्यक्ष हरिभाऊ तिकोने यांनी प्रस्तुतची सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
**तिकोने हरिभाऊ किसन**
**अध्यक्ष**
**ब प्रभाग समिती, चिंचवड**

प्रति,
सर्व संबंधित

**प्रशासन अधिकारी**
**सभाशाखा, ब प्रभाग समिती**
**पिं.चिं. मनपा, चिंचवड-३३**

क्र. एएमसी/बप्र२/कावि/६४ /२०१० दि. १ / २ /२०१०